CNR NO - MHCH090004062024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०९.०५.२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | ०९.०५.२०२४ |
| निकाल दिनांक | : | ०२.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०१ ११ २३ |

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय,
ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर
(पिठासीन अधिकारी श्री. यु. पी. शिंदे)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३०३/२०२४ निशाणी क्र.१७

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी
पोलीस स्टेशन गोंडपिपरी, ....अभियोगपक्ष
ता. गोंडपिपरी जिल्हा. चंद्रपूर

-विरुध्द-

अनुप बाबुराव बोरकुटे,
वय- ३४ वर्षे, व्यवसाय – शेती,
राह. घडोली, ता. गोंडपिपरी,
जि. चंद्रपूर. ......आरोपी

गुन्हाः महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ८५ (१) अन्वये

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर. बी. धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. आर.एम.कांबळे

न्यायनिर्णय
(अधिघोषीत दिनांक ०२.०५.२०२६)

सदर खटला अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ८५ (१) अन्वये चालविला आहे.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की-

२. दिनांक १५.०४.२०२४ रोजी फिर्यादी पोलीस स्टाफसह पोलीस स्टेशन गोंडपिपरी हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या माहितीनुसार ते मौजा घडोली येथील सिमेंट रोडवर गेले असता आरोपी हा दारु पिऊन दारुचे नशेत आरडा ओरड करून धामधुम करुन सार्वजनिक शांतता भंग करीत असताना मिळून आला. त्यामुळे पंचासमक्ष त्यास नाव गाव विचारले असता त्याने अडखळत अडखळत आपले नावे

अनुप बाबुराव बोरकुटे असे सांगितले. त्यावेळी पंचांनी त्याचे तोंडाचा वास घेतला असता आंबट, उग्र वास येत असल्याचे व दारु पिऊन असल्याचे पंचांनी सांगितले. आरोपीला पंचासमक्ष समजाविण्याचा प्रयत्न केला असता तो समजण्याच्या स्थितीत नव्हता. त्यामुळे त्यास ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करीता ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथे नेऊन वैद्यकीय तपासणी केली असता वैद्यकीय अधिकारी यांनी आरोपी हा दारु पिऊन असून तो दारुच्या अंमलाखाली असल्याचा अभिप्राय दिला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन गोंडपिपरी पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द अप.क्र. १३५/२०२४ प्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ८५ (१) अन्वये गुन्हा नोंद झाला. सदर गुन्ह्याचा तपास सहा.फौजदार श्री. वसंत कोसमशिले यांनी केला.

४. त्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र. ११ वर महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ८५ (१) अन्वये अपराधाकरीता आरोप निश्चीत केला. जो त्याला मराठी भाषेत समजावून सांगण्यात आला असता त्याने तो नाकारला व संपरिक्षेची विनंती केली. अभियोग पक्षाचा साक्षीपुरावा संपल्यानंतर फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविले आले.

५. अभियोग पक्षाचा पुरावा, आरोपीचा बचाव व दोन्ही बाजुंच्या युक्तीवादानंतर खालील प्रश्न विचारार्थ उपस्थित होत आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणासहित खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १५/०४/२०२४ रोजी २०.०० ते २०.३० वाजेच्या सुमारास मौजे घडोली, ता. गोंडपिपरी, जि.चंद्रपूर येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपीने मद्याच्या अंमलाखाली जोरजोराने आरडाओरड करुन असभ्य वर्तन करुन सार्वजनिक शांतता भंग केली व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ८५(१) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दे क्र. १ ते २ करीता</u>

६. आरोपीविरुध्दचा दोष सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने साक्षीदार

क्र. १ सहा.फौ. श्री. माणिक नानाजी वाग्दरकर – फिर्यादी व साक्षीदार क्र. २ हेमराज प्रभाकर चौधरी - पंच यांना अभिलेखावर तपासले आहे.

७. साक्षीदार क्र. १ श्री. माणिक नानाजी वाग्दरकर यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखत असून दिनांक १५.०४.२०२४ रोजी ते गोंडपिपरी पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस होते. त्या दिवशी त्यांची प्रोव्हीबिशन रेड ड्युटी लावण्यात आली होती. ते घडोली परिसरात पेट्रोलींग करीत असताना त्यांना खात्रीशीर खबर मिळाली की, आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन आरडा ओरडा करत होता. त्यानंतर त्यांनी जायला सांगितले परंतु जास्त आरडा ओरडा करु लागला. त्यावेळी पंचांना त्याच्या तोंडाचा वास घ्यायला सांगितला असता त्यांनी दारु पिला असल्याचे सांगितले. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा केला. त्यानंतर पोलीस स्टेशनला येऊन त्यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. सदर साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये सुचक प्रश्न नाकारले आहे.

८. साक्षीदार क्र. २ हेमराज चौधरी यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखत असून तो त्यांच्या गावचा आहे. त्यावेळी ते सरपंच होते. त्यांनी कशाबाबत सही केली हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. या साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन न केल्यामुळे त्यावेळी त्यांना अभियोग पक्षाने विचारलेल्या सुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

९. उपरोक्त तोंडी व लेखी पुराव्याचे अवलोकन केले. याप्रकरणी दोषारोपप्रमाणे आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी मद्याच्या अंमलाखाली आरडाओरडा करुन सार्वजनिक शांततेचा भंग करता मिळून आला. याप्रकरणी सा.क्र. १ चे अवलोकन केले असता, ते पोलीस कर्मचारी आहेत. पंच साक्षीदारांचे साक्षीतून अभियोगपक्षास लाभदायक असे काहीही समोर आले नाही. या प्रकरणी आरोपी हा मद्यार्थाच्या अंमलाखाली होता हे दर्शविण्यासाठी संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे सदर आरोपी हा त्यावेळी मद्याच्या अंमलाखाली होता हे सिध्द झालेले नाही. सदर परस्पर विरोधी पुरावा पाहता केवळ तपासी अंमलदार यांचे साक्षीवर अवलंबून राहून आरोपी हा घटनेच्या वेळी मद्याच्या अंमलाखाली आरड ओरड करीत होता असे म्हणता येणार नाही.

१०. वर नमूद चर्चा विचारात घेता अपुऱ्या स्वरूपाच्या पुराव्यावर विसंबून राहून घटनेच्या वेळी व ठिकाणी आरोपीने सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन आरडाओरड करुन सार्वजनिक शांतता भंग केल्याचे सिध्द होत नाही. सबब आरोपीला प्रस्तुत गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून मी प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून प्रश्न क्र. २ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. आरोपी अनुप बाबुराव बोरकुटे याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ८५ (१) नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामिनपत्र रद्द केले.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रुपये १५,०००/- चे बंधपत्र व तितक्याच रकमेचे जामीनपत्र करुन द्यावे, जे अपील कालावधी संपुष्ठात येईपर्यंत वैध राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

**(Sd-)**
**(**यु**.** पी**.** शिंदे **)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
गोंडपिपरी.

दिनांक : ०२.०५.२०२६